# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

विषय: महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका - २०२४ च्या अनुषंगाने बुधवार **दिनांक २० नोव्हेंबर, २०२४** रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याबाबत.

संदर्भ: 1) शासनाची अधिसुचना क्र.सार्वसु-१०२४/प्र.क्र.१३६/जपुक (२९) दि.३० ऑक्टोबर, २०२४

2) परिपत्रक क्र.प्रकाअ/०३ दि.०१.०१.२०२४

महाराष्ट्र राज्य शासनाने उपरोक्त संदर्भाधीन अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका-२०२४ च्या अनुषंगाने **बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२४** रोजी सर्व विधानसभा मतदार संघात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे, त्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व खाते/विभाग प्रमुख यांनी अत्यावश्यक सेवेमध्ये खंड निर्माण होणार नाही व त्या सुरळीतपणे चालू राहतील या दृष्टीने पुढील आदेशांचे काटेकोरपणे पालन करुन योग्य ती खबरदारी घ्यावी.

1. सदर सार्वजनिक सुट्टी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील कामगार/ कर्मचारी वगळता इतर कामगार/कर्मचारी वृंदास लागू राहील.
2. तथापि, अत्यावश्यक सेवेत काम करणा-या कामगार/कर्मचा-यांना, **दिनांक २० नोव्हेंबर २०२४** रोजी मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून, **अर्ध्या दिवसाची** सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. तसेच अत्यावश्यक सेवेत काम करणारे जे कामगार/कर्मचारी दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी कामावर उपस्थित राहतील अशा कामगार/कर्मचारी यांना परिपत्रक क्र.प्रकाअ/०३, दि.०१.०१.२०२४ मधील निर्देशीत केलेल्या सुचनांनुसार संबंधित कामगार/कर्मचा-यांच्या अर्जित रजा खात्यामध्ये एक दिवसाची अर्जित रजा (E.L.) जमा करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in/circular या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/- दि. ५.११.२०२४ | सही/- दि. ५.११.२०२४ |
| (रश्मी खोत) | (सुनिल तु.जांगळे) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | प्रमुख कामगार अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| सही/- दि. ६.११.२०२४ | सही/- दि. ७.११.२०२४ | सही/- दि. ८.११.२०२४ |
| (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| उप आयुक्त (सा.प्र) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक: प्रकअ/१३९/सर्वसा/(एमओपी/३१६)
दिनांक: ११-११-२०२४

प्रत-------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)
माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

सुसवारिक
११-११-२०२४

(श्रीम.सुजाता सं. वारिक)
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण)